# तुळजारामच्या विद्यार्थ्यांचे आगरवाल विद्यालयात सायबर सिक्युरिटीवर मार्गदर्शन

बारामती/ प्रतिनिधी



तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती आणि क्रिक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा उपक्रम राधेश्याम एन आगरवाल टेक्निकल इन्स्टिट्यूट व ज्युनिअर कॉलेज बारामती येथे राबवण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांसमोर सायबर सुरक्षेची माहिती अत्यंत प्रभावी आणि संवादात्मक पद्धतीने सादर केली.सत्रात डिजिटल युगातील वाढत्या सायबर गुन्ह्यांबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात आला. सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, फेक लिंक्स आणि जाळ्या स्कॅमची ओळख, पासवर्ड संरक्षण तसेच वैयक्तिक माहितीची गोपनीयता जपण्याचे महत्त्व यावर विद्यार्थ्यांना समजेल अशा उदाहरणांसह माहिती देण्यात आली. संपूर्ण सत्र विद्यार्थ्यांच्या समजुतीला सोपी आणि रुचकर ठरेल अशा शुद्ध मराठी भाषेत घेण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि चांगला प्रतिसाद लाभला.या कार्यक्रमाचं विशेष वैशिष्ट्य म्हणजे प्रेझेंटेशनबरोबरच वक्तृत्व, प्रश्नमंजुषा आणि संवादात्मक सत्राचा समावेश, ज्यामुळे विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेबाबत शिकण्याचा अनुभव घेतला. डॅव्हलझ वक्ताश ऑपवर्कीप च्या मार्गदर्शनाखाली तयार केलेली माहिती अभ्यासपूर्ण आणि वास्तवाशी जोडलेली असल्याने ती विद्यार्थ्यांना अधिक प्रभावी वाटली.या विद्यालयाचे प्राचार्य भगवान भिसे, उपमुख्याध्यापक सतीश पाचपुते ,पर्यवेक्षिका सौ. अलका चौधर व सर्व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थिनींच्या या सत्राचे विशेष कौतुक केले. प्रा.भगवान भिसे यांनी अशा उपक्रमांनी विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक जगात सुरक्षित व जबाबदार नागरिक बनण्याची जाणीव निर्माण होते, असे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनीही याचा उपयोग त्यांच्या दैनंदिन डिजिटल व्यवहारांमध्ये नक्कीच होईल, अशी प्रतिक्रिया दिली. उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांमध्ये क्लबचे अध्यक्ष अभय साहू, सचिव संदिप माने, गतिविधी संचालक – ज्योती गुरव, मिडिया संचालक – सायली ढगे आणि सायबर वॉरियर्स – बाळकृष्ण शिंदे, वृषाली जानभरे, वरद साळवे, रोहन लोखंडे, यश झिंगाडे, योगिता माने, सलोनी शेख, शर्वरी बाचल, सिद्धार्थ काळे, निकीता पोमणे, दिशा जाडकर, यांचा समावेश होता